17 SEP 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : खेलो इंडिया महिला बास्केटबॉल लीगचे उद्घाटन प्र. कुलगुरू पी. एस. पाटील व मान्यवरांच्या हस्ते झाले.

# सरावाने आंतरराष्ट्रीय कीर्तीचे खेळाडू घडतील : डॉ. पी. एस. पाटील

## खेलो इंडिया महिला बास्केटबॉल स्पर्धा सुरू

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : कष्टाने आणि नियमित सरावाने आंतरराष्ट्रीय कीर्तीचे खेळाडू आपण घडू शकतो, असे मत प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केले.

भारतीय क्रीडा प्राधिकरणअंतर्गत खेलो इंडिया महिला बास्केटबॉल लीगचे आयोजन शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर वड्डू इट बास्केटबॉल ॲकॅडमी यांच्यातर्फे शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा संकुलामध्ये केले आहे. या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

महाराष्ट्रामध्ये तीन ठिकाणी या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या वेळी कोल्हापूर जिल्हा बास्केटबॉल संघटनेचे उपाध्यक्ष नितीन दलवाई, संचालकक्रीडा व शारीरिक शिक्षण डॉ. शरद बनसोडे, डॉ. आर. जी. पवार, उद्योगपती मानसिंग पाटील, राष्ट्रीय खेळाडू डॉ. जस्सीका अँड्रॉज, वि. स. खांडेकर प्रशाला उपप्राचार्य डी. के. रायकर, प्रकाश आबिटकर, प्राचार्य डॉ. सुरेश फराकटे यांच्या उपस्थितीत होते.

प्रा. सुचय खोपडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. स्पर्धेचे नियोजन बास्केटबॉल रेफ्री अध्यक्ष आशुतोष खराडे व अमित दलाल करीत आहेत. केदार सुतार, शुभम मोहिते, राजवर्धन आंबेकर, अमित व्हटकर, विशाल मगदूम, कुणाल पाटील, किशोर हवलदार, प्रतीक काशीद, आदित्य भोंगाळे, दीपक पाटील यांनी नियोजन केले.

### स्पर्धेत २२ संघांचा सहभाग

▪ स्पर्धेमध्ये कोल्हापूर शहर, वारणानगर, घुणकी, इचलकरंजी, पन्हाळा, जयसिंगपूर, हातकणंगले व कोडोली येथून एकूण २२ महिला संघांनी सहभाग घेतला आहे. सहभागी खेळाडूंना खेलो इंडियातर्फे प्रमाणपत्र दिले जाणार आहेत. विजयी संघांना चषक प्रदान करण्यात येणार आहे.

Times of India

# Law dept holds Cyber Crime Awareness lecture at SUK

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Cybercrime investigation expert Sandeep Gadia on Saturday addressed students of Kolhapur Chamber of Commerce and Law department of Shivaji University, Kolhapur.

Law Department of SUK on behalf of Kolhapur Chamber of Commerce and Industries, conducted a programme on the topic 'Cyber Crime Awareness: Issues and Precautions'.

Sandeep Gadia is a cyber crime expert who was invited by the Rajya Sabha parliamentary committee during the amendments of Cyber Crime and Amendments to the Information Technology Act, 2000.

He trained over 58,000 police officers, over 2,800 IAS, IPS, central government officers, and over 12,000 state government officers.

The cybercrime investigation expert said that one must report the fraud to the nearest cyber police. He talked about different types of cyber crimes, hacking, phishing, debit and credit card cyber fraud with examples. He gave tips on security measures while shopping online.

Deputy superintendent of Anti-Corruption Bureau Sardar Nale said, "It is my duty to help the common man. Officials are always available to assist".

TOI



The speaker panel for the lecture at SUK on Saturday

1 7 SEP 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संदीप गादिया यांचा सल्ला : सायबर गुन्ह्यांबाबत विद्यापीठात चर्चासत्र

# तुम्ही सावध राहाल तरच सायबर क्राइम रोखाल

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : रोज नव्या स्वरूपात, नव्या आकारात आणि नव्या शस्त्रासह सायबर क्राइमची भयानकता वाढत आहे. अशा व्यापक स्वरूपात पुढे आलेल्या सायबर क्राइमला रोखण्यासाठी स्वत:च जागरूक राहणे हेच आपल्या हाती आहे, असा सल्ला सायबर क्राइम इनव्हेस्टिगेशन एक्स्पर्ट संदीप गादिया यांनी शनिवारी केले.





## गादिया यांनी दिल्या टिप्स

- कार्ड देणाऱ्या बँकेशी त्वरित संपर्क साधा आणि व्यवहार व कार्डही ब्लॉक करा.
- ई-कॉमर्स वेबसाइटच्या ग्राहक कार्डावर संपर्क साधा आणि त्यांना व्यवहार थांबवण्यासाठी आणि ते अकाउंट गोठवण्याची विनंती करा.
- तुमच्या कार्डाचा, खात्याचा पासवर्ड किंवा पिन क्रमांक बदला.
- सायबर विमा कंपनीला माहिती द्या.

शिवाजी विद्यापीठातील विधी विभाग आणि कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रिजच्या वतीने वि. स. खांडेकर भाषा भवनात आयोजित 'सायबर गुन्ह्याबद्दल जागरूकता: समस्या आणि खबरदारीचे उपाय' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षपदी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.

गादिया म्हणाले, तज्ज्ञांच्या निष्कर्षानुसार आज डेटा थेप्ट, सायबर स्टॉकिंग, हॅकिंग, व्हायरस अटॅक, पोर्नोग्राफी ही महत्त्वाची सायबर आव्हाने, तर आहेतच. त्याशिवाय सॉफ्टवेअर पायरसी, फिशिंग, स्पुफिंग, स्टॉकिंग, क्रेडिट कार्ड फ्रॉड, थ्रेटनिंग, ड्रग्ज ट्रॅफिकिंग, सायबर टेररिझम असे असंख्य प्रकारचे सायबर गुन्हे घडताहेत. भारतात हॅकिंग, पोर्नोग्राफी आणि डेटा थेप्ट या स्वरूपाचे गुन्हे आयटी सेक्शनखाली नोंदविले जातात. परंतु याला व्यापकता येऊन सायबर क्राइमखाली येणारे सर्व गुन्हे आयटी सेक्शनखाली नोंदवणे महत्त्वाचे आहे.

यावेळी लाचलुचपत प्रतिबंधक शाखेचे उपअधीक्षक सरदार नाळे, प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष संजय शेटे यांनी प्रास्ताविकात संस्थेची माहिती दिली. विधी विभागाचे प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे यांनी आभार मानले. चेंबर ऑफ कॉमर्सच्या संचालिका सीमा जोशी यांनी सूत्रसंचालन केले. चेंबर्सचे उपाध्यक्ष शिवाजीराव पोवार आणि संजय पाटील, हरिभाई पटेल, उज्ज्वल नागेशकर आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# मंगला चौगुलेंकडून महावीर अध्यासनाला दीड लाख रुपये देणगी

कोल्हापूर : महापर्युषण पर्वाच्या पवित्र कालखंडात शाहुपुरीतील मंगल चौगुले यांच्याकडून भगवान महावीर अध्यासनास दीड लाख रुपये देणगी देण्यात आली आहे. चौगुले यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे धनादेश सुपूर्द केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व वित्त व लेखा अधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. बी. डी. खणे, प्रा. मनिषा काडाप्पा, मंगला लिंबेकर आदी उपस्थित होते. भगवान महावीर अध्यासनाचे डॉ. विजय ककडे यांनी केले.

सकाळ

# दूरशिक्षण केंद्राचा उद्या ऑनलाइन माजी विद्यार्थी मेळावा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील २०२२-२३ मधील विद्यार्थ्यांसाठी माजी विद्यार्थ्यांचा ऑनलाईन मेळावा सोमवारी (ता. १८) दुपारी बारा वाजता आहे. बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए. अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी मेळावा आहे. वाणिज्य विभागप्रमुख प्रा. डॉ. ए. एम. गुरव 'पदवी व पदव्युत्तरनंतरचे शिक्षण'वर मार्गदर्शन करतील. ttp://shivajiuniversity.webex.com/shivajiuniversity/j.ph लिंकद्वारे मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

पुढारी

# ‘दूरशिक्षण’च्या माजी विद्यार्थ्यांचा उद्या मेळावा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए. या अभ्यासक्रमातील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विद्यार्थ्यांसाठी माजी विद्यार्थ्यांचा मेळावा सोमवारी (दि. १८) दुपारी १२ वाजता ऑनलाईन पद्धतीने आयोजित केल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

लोकमत

# विद्यापीठाच्या परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखांना मुदतवाढ देण्यात आली आहे. सातारा जिल्ह्यामध्ये पुसेसावळी येथे झालेल्या दंगलीमुळे इंटरनेट सुविधा काही दिवस बंद असल्याने विद्यार्थी हितास्तव महाविद्यालयाकडून परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखांना मुदतवाढ देण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना विनाविलंब अर्ज भरण्यासाठी २१ सप्टेंबर, विलंबासहित २३ सप्टेंबर आणि अतिविलंबासहित अर्ज भरण्यासाठी २५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. महाविद्यालयांनी विद्यापीठात अर्ज सादर करण्यासाठी २६ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

पुढारी

# ऑनलाईन नोंदणी पात्रता अर्जासाठी मुदतवाढ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाने महाविद्यालयांनी केलेली विनंती आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून विनाविलंब ऑनलाईन नोंदणी पात्रता अर्ज करण्यासाठी २० सप्टेंबरअखेर मुदतवाढ दिली आहे.

याआधी १६ सप्टेंबरअखेर मुदतवाढ दिली होती. मात्र, सातारा जिल्ह्यामध्ये सर्व कंपन्यांचे इंटरनेट नेटवर्क बंद करण्यात आल्याने महाविद्यालयांनी नियमित शुल्कासह ऑनलाईन नोंदणी पात्रता अर्ज करण्यासाठी मुदतवाढ मिळण्याबाबत विनंती केल्याने ही मुदतवाढ देण्यात येत आहे.

सकाळ

# अभियांत्रिकी पुरवणी परीक्षेसाठी २२ पर्यंत अर्ज भरण्याची मुदत

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील बी. टेक. (सीबीसीएस) अभ्यासक्रमाच्या प्रथम ते अंतिम वर्षातील इअर डाऊन विद्यार्थ्यांची पुरवणी परीक्षा होत आहे. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार ही परीक्षा होणार आहे. दरम्यान, परीक्षेसाठी अर्ज भरण्याची मुदत २२ सप्टेंबरपर्यंत आहे. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेतंर्गत संलग्नित महाविद्यालयांतील बी. टेक. च्या अभ्यासक्रमासाठी मार्च/एप्रिल २०२३ च्या परीक्षेत जे विद्यार्थी इयर डाऊन झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना ही पुरवणी परीक्षा देता येईल. तसेच इयर डाऊन झालेल्या विद्यार्थ्यांच्या व्यतिरिक्त असलेल्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरू नयेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

सकाळ

# विद्यापीठाकडून परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२३ मधील हिवाळी सत्राच्या परीक्षा अर्ज भरण्याच्या मुदतीत वाढ करण्यात आली आहे. विनाविलंब शुल्क अर्ज भरण्याची मुदत २१ सप्टेंबरपर्यंत केली आहे. सातारा जिल्ह्यातील इंटरनेट सुविधा काही काळ बंद असल्याने महाविद्यालयांकडून परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखांना मुदतवाढ मिळावी, अशी मागणी करण्यात आली. त्यामुळे विद्यार्थी हितास्तव अर्ज भरण्याच्या मुदतीत वाढ करण्यात आली आहे. अर्ज भरण्याच्या तारखा पुढीलप्रमाणे आहे. विनाविलंब (२१ सप्टेंबर), विलंब शुल्कासह (२३ सप्टेंबर) व अतिविलंब शुल्कासह (२५ सप्टेंबर).

तरुण भारत

# परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

## नियमित शुल्कासह २१ सप्टेंबरपर्यंत अर्ज भरण्यास मुदत

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२३ हिवाळी सत्रातील परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. महाविद्यालयात किंवा पदव्युत्तर अधिविभागातील विद्यार्थ्यांनी नियमित शुल्कासह २१ सप्टेंबरपर्यंत परीक्षा अर्ज भरावयाचा आहे. परीक्षा अर्ज भरण्याच्या सुधारीत तारखा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२३ हिवाळी सत्रातील परीक्षा अर्ज विनाविलंब शुल्कासह २१ सप्टेंबरपर्यंत भरावयाचा आहे. विलंब शुल्कासह (५० रुपये ज्यादा) २३ सप्टेंबर आणि अतिविलंब शुल्कासह (३५० रुपये ज्यादा) २५



सप्टेंबरपर्यंत अर्ज भरावयाचा आहे. महाविद्यालय किंवा पदव्युत्तर अधिविभागांनी ऑनलाईन परीक्षा अर्ज नियमित शुल्कासह २२ सप्टेंबरपर्यंत, विलंब शुल्कासह २३ सप्टेंबर आणि अतिविलंब शुल्कासह २५ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन स्वीकारायचा आहे. महाविद्यालय अथवा पदव्युत्तर अधिविभागाने परीक्षा अर्ज २६ सप्टेंबरपर्यंत जमा करावयाचे आहेत. तरी विद्यार्थी, महाविद्यालय आणि अधिविभागांनी याची दखल घ्यावी, असे आवाहन केले आहे.

तरूण भारत

# अभियांत्रिकी पुरवणी परीक्षेसाठी अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर

कोल्हापूर : अभियांत्रिकी प्रथम ते अंतिम वर्षाच्या पुरवणी परीक्षा घेण्यास अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे. मार्च-एप्रिल २०२३ पुरवणी परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. इअर डाऊन झालेल्या विद्यार्थ्यांनाच या परीक्षेसाठी अर्ज भरता येणार आहे. पुरवणी परीक्षेसाठी उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत, पुनर्मूल्यांकन, गुणपडताळणी सुविधा नाहीत. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात २० ते २२ सप्टेंबरपर्यंत विनाविलंब शुल्कासह पुरवणी परीक्षा अर्ज भरावयाचा आहे. महाविद्यालयाने परीक्षा अर्ज २२ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन स्वीकारायचे आहेत. ४ ऑक्टोबर रोजी पुरवणी परीक्षेला प्रारंभ होणार आहे. तरी २०० रुपये पुरवणी परीक्षा शुल्क भरून परीक्षा अर्ज भरावयाचा आहे, याची दखल विद्यार्थी व महाविद्यालयांनी घेऊन वेळेत परीक्षा अर्ज भरावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.